# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः17.05.2024** **वारःशुक्रवार**

1.लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी राज्यात प्रचाराची रणधुमाळी; पंतप्रधान आणि ज्येष्ठ भाजपा नेते नरेंद्र मोदी यांची आज मुंबईत जाहीर सभा

2.घाटकोपरमधल्या जाहिरात फलक दुर्घटनेतील मृतांची संख्या १६; या प्रकरणी प्रमुख आरोपीला अटक

3.अवकळी पावसामुळे आतापर्यंत राज्यातल्या सुमारे साडेपाच हजार हेक्टरवरच्या पिकांचं नुकसान

आणि

4.येत्या दोन दिवसात राज्याच्या विविध भागात मेघगर्जनेसह पावसाचा हवामान विभागाचा अंदाज

**<u>प्रचार</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी सध्या राज्यात जोरदार प्रचार सुरू आहे. विविध पक्षांचे नेते प्रचार सभा, प्रचारफेऱ्या आणि बैठका घेऊन मतदारांना आवाहन करत आहेत. भाजपाचे वरिष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईत शिवाजीपार्क इथं प्रचार सभा घेणार आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांच्यासह मनसे नेते राज ठाकरे यात सहभागी होणार आहेत.

नाशिक मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल नाशिकमध्ये रोड शो केला. समारोपाच्या वेळी झालेल्या भाषणात शिंदे यांनी माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली.

दिंडोरी लोकसभा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नाशिक जिल्ह्यातील मनमाड इथं प्रचार सभा घेतली. केंद्रात भाजपाची सत्ता आल्यावर पश्चिम वाहिनी नद्यांचं पाणी वळवून नाशिक, नगर आणि मराठवाड्याचा पाणी प्रश्न कायमस्वरूपी सोडवू असं ते म्हणाले.

ज्यांनी २५-२५ वर्ष मुंबईवर राज्य केलं त्यांना मुंबईकरांच्या घराचा प्रश्न का सोडवता आला नाही, असा सवाल फडणवीस यांनी केला. महायुतीचे उमेदवार उज्ज्वल निकम यांच्या प्रचारार्थ कुर्ला पूर्व इथं आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते.

आरक्षण आणि संविधानाच्या मुद्द्यावर काँग्रेसकडून मतदारांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा आरोप भारतीय जनता पार्टीच्या ओबीसी मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष के. लक्ष्मण यांनी काल मुंबईत केला. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

जो शेतकऱ्यांच्या मेहनतीला किंमत देत नाही त्यांना सत्तेत राहण्याचा अधिकार नाही असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काल धुळे जिल्ह्यात सटाणा इथल्या जाहीर सभेत केला. धुळे लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉ. शोभा बच्छाव यांच्या प्रचारार्थ पवार यांनी जाहीर सभा घेतली.

शरद पवार यांनी काल दिंडोरी लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर भगरे यांच्या प्रचारासाठी मनमाडमध्येही सभा घेतली.

गेल्या १० वर्षात नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकाने कामगार हिताचे कायदे बदलून उद्योगपती धार्जिणे कायदे बनवले असा आरोप कॉंग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केला. ते काल मुंबईत राष्ट्रीय मजदूर काँग्रेसच्या मेळाव्यात बोलत होते.

**मतदार जन जागृती**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात राज्यातल्या 13 मतदार संघांत येत्या 20 तारखेला मतदान होणार आहे. यावेळी मतदानाचा टक्का वाढवण्यासाठी निवडणूक आयोगाकडून जनजागृती करण्यात येत आहे. ठाण्यात कोरम मॉल इथं  युवा वर्गाने फ्लॅशमॉबद्वारे मतदारांमध्ये जागृती केली. तर नवी मुंबई महापालिकेत  शंभरहून अधिक महिला स्वच्छताकर्मींना अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांनी मतदानाचं महत्व सांगितलं. या सर्व स्वच्छतासखींनी मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला.

**मतदान आढावा**

धुळे लोकसभा मतदार संघात मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार दिलेली जबाबदारी पार पाडावी, असे निर्देश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी काल धुळ्यात दिले. निवडणूकविषयक आढावा बैठकीत ते बोलत होते. दरम्यान धुळे लोकसभा मतदारसंघामध्ये अत्यावश्यक सेवेत कार्यरत असलेल्या 895 कर्मचाऱ्यांनी टपाली मतदानाद्वारे आपला मतदानाचा हक्क बजावला आहे.

**घाटकोपर दुर्घटना**

मुंबईतील घाटकोपरमध्ये वादळी वाऱ्यात जाहिरातीचा महाकाय फलक पेट्रोल पंपावर पडून झालेल्या दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला आहे. विविध यंत्रणांमार्फत सुरू असलेलं बचाव कार्य आता संपलं असल्याची माहिती मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी काल बातमीदारांना दिली. मुंबई शहरात असणाऱ्या सर्व अशा पद्धतीच्या जाहिरात फलकांची तपासणी करण्यात येत असल्याचं  गगराणी यांनी सांगितलं. दरम्यान या प्रकरणातील मुख्य आरोपी भावेश भिंडे याला काल राजस्थानमधील उदयपूर इथून मुंबई पोलीसांनी अटक केली. इगोमिडीया प्रायव्हेट लिमिटेड नावाच्या कंपनीचा तो मालक आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील मोशी इथं अधिकृत परवानगी असलेला जाहीरात फलक काल पाऊस आणि वाऱ्यामुळे पडला. रस्त्यावर उभ्या असलेल्या टेम्पोवर हा फलक पडला; त्यामध्ये कोणतीही जिवीत हानी झाली नाही. शहरातील सर्व होर्डिंग्जबाबत संबंधितांची बैठक आयुक्त शेखर सिंह आज घेणार आहेत. घाटकोपर जाहिरात फलक दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर इतर जिल्ह्यांमध्येही खबरदारीच्या सूचना देण्यात येत आहेत.

**अवकाळी पाऊस**

राज्यात विविध जिल्ह्यांमध्ये काल पावसानं कमी-अधिक प्रमाणात हजेरी लावली. त्यामुळे आलेल्या सुखद गारव्यामुळे उष्णतेनं त्रस्त झालेल्या लोकांना दिलासा मिळाला आहे, तर काही ठिकाणी पावसानं नुकसान झालं आहे.

गडचिरोली, बुलडाणा, सांगली आणि लातूर जिल्ह्यामध्ये काल मेघगर्जनेसह पावसानं हजेरी लावली.

सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या काही भागातही काल वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. कणकवली तालुक्याला याचा मोठा फटका बसला असून काही घरांचं नुकसान झालं आहे.

**<u>अवकाळी फटका-</u>**

राज्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे सुमारे साडेपाच हजार हेक्टरवरील शेती आणि फळपिकांचं नुकसान झालं तसंच १९ जिल्हयातील उन्हाळी पिकं आणि फळबागांना फटका बसला आहे. गोंदिया, भंडारा, नाशिक जिल्हयात सर्वाधिक नुकसान झालं असल्याचं कृषी विभागाच्या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. आंबा, नारळ, फणस, काजू, केळी, द्राक्षे, पपई, लिंबू आदीसह भाजीपाला कांदा, मका, मिरची, तीळ तसंच भात, गहू, रब्बी ज्वारीच्या पिकांचं नुकसान झालं आहे. अवकाळी पाऊस अजूनही सुरूच असल्यामुळे नुकसानीचा आकडा वाढण्याचा अंदाज कृषी विभागानं व्यक्त केला आहे.

**<u>खतप्रस्ताव</u>**

राज्यात खरीप हंगामासाठी पुरेसा खतांचा साठा उपलब्ध असून कृषी विभागानं यंदा ४४ लाख ५६ हजार टन रासायनिक खतांचा साठा मंजूर केला आहे. मे महिन्याच्या सुरुवातीपर्यंत राज्यात २९ लाख १९ हजार टन खतांचा साठा होता. उर्वरित खतांचा पुरवठा केंद्राकडून होणार आहे. खतांच्या विक्रीमध्ये काळाबाजार किंवा अन्य गैरप्रकार होत असल्याचं आढळल्यास कृषी विभागाशी संपर्क करावा, असं अवाहन पुणे कृषी विभागाचे संचालक विकास पाटील यांनी केलं आहे.

**<u>राहुरी विद्यापीठ</u>**

कृषि शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या व्यवसाय करण्यासंबंधीच्या नाविन्यपूर्ण कल्पना अंमलात आणण्यासाठी काम करावं, असं आवाहन राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केलं. विद्यापीठात कृषि उद्योजकता या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

**<u>बैठक</u>**

साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी काल मान्सूनपूर्व आढावा बैठक घेतली. हवामान विभागानं मुसळधार पावसाचा इशारा दिला तर पूर आणि दरडप्रवण गावातील नागरिकांना त्यांच्या पशुधनासह तात्काळ हलविण्याची व्यवस्था करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

**<u>कामांची पाहणी</u>**

नवी मुंबई महानगरपालिकेच्या ७७ लहान मोठया नैसर्गिक नाल्यांच्या सफाईचं काम सुरू आहे. ८५ टक्के नालेसफाई पूर्ण झाली असून उर्वरित काम लवकरात लवकर पूर्ण करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश अतिरिक्त आयुक्तांनी संबंधित विभागांना दिले आहेत.

**<u>गांगुर्डे निधन</u>**

माजी आमदार आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक विश्वास गांगुर्डे यांचं काल पहाटे पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. ते ८० वर्षांचे होते. १९७८मध्ये सर्वप्रथम ते दत्तवाडी-राजेंद्रनगर प्रभागातून आणि नंतर १९९२ मध्ये गणेशखिंड प्रभागातून पुणे महापालिकेत नगरसेवक म्हणून निवडून आले. १९९९मध्ये पर्वती विधानसभा मतदारसंघातून ते आमदार झाले होते. महामँगो या राज्य शासनाच्या संस्थेचे ते काही काळ अध्यक्ष होते.

**<u>हुतात्मा</u>**

धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यातील गोराणे इथले जवान कमलेश  कदम यांना आंध्रप्रदेशात कर्तव्यावर असताना गेल्या मंगळवारी वीरमरण आलं. ते ३२ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर काल धुळे शहराला लागून असलेल्या महिंदळे गावात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मॉन्सून**

नैऋत्य मौसमी पाऊस यंदा ३१ मे च्या सुमारास केरळमध्ये दाखल होईल, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. गेल्या वर्षी आठ जून रोजी मान्सून केरळमध्ये आणि ११ जून रोजी महाराष्ट्रात दाखल झाला होता. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, यंदा २८ मे ते ४ जून दरम्यान हा पाऊस दाखल होईल. दक्षिण अंदमानमध्ये येत्या रविवारपर्यंत मान्सून येण्याची शक्यता हवामान खात्यानं यापूर्वीच वर्तवली आहे.

**हवामान -**

येत्या दोन दिवसांत मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये जोरदार वारे वाहण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.